७१५२.
जा.क्र. /२०२६
अतिरीक्त जिल्हा न्यायालय, वडूज
दिनांक:- १६/०६/२०२६

निविदा

अतिरीक्त जिल्हा न्यायालय, वडूज, ता.खटाव, जि.सातारा या न्यायालयाच्या न्यायालयीन तसेच कार्यालयातील कामकाजासाठी वापरलेला व विहीत मुदत संपल्यामुळे नाश करावयाचा कागदाची रद्दी तसेच खाकी पुठ्ठे (बॉक्सचे) विकणेसाठी निविदा मागविणेत येंत आहेत.

त्याचा तपशिल खालील प्रमाणे -

क्र.	तपशिल
१	कागदाची रद्दी
२	खाकी पुठ्ठे (बॉक्सचे)

सदर कागदाची रद्दी तसेच खाकी पुठ्ठे ज्या स्थानिक खरेदीदारांना विकत घ्यावयाचे आहे, त्यांनी त्यांच्या निविदा मा.जिल्हा न्यायाधीश-१, वडूज, ता.खटाव, जि.सातारा यांचे नावे सिलबंद लखोटयात त्यावर " कागदाची रद्दी तसेच खाकी पुठ्ठे खरेदी करणेकरीता निविदा " असा स्पष्ट उल्लेख करून त्या दिनांक २५/०६/२०२६ रोजीच्या कार्यालयीन वेळेपुर्वी अगर त्यापुर्वी अतिरीक्त जिल्हा न्यायालय, वडूज, ता.खटाव, जि.सातारा येथे सादर कराव्यात. सिलबंद निविदेवर आपल्या फर्मचे नांव, सविस्तर पत्ता, संपर्क नंबर असणे आवश्यक आहे.

अ) निविदा स्वीकारण्याचे व नाकारण्याचे सर्व अधिकार अति.जिल्हा न्यायालय,वडूज तसेच मा.जिल्हा न्यायायल, सातारा यांचेकडे राहतील.

ब) ज्यांची निविदा मंजूर करणेत येईल त्यांनी रद्दीचा कागद तसेच खाकी पुठ्ठे अतिरीक्त जिल्हा न्यायालय, वडूजच्या अभिलेख्यातून स्वखर्चाने नेणेचा आहे.

क) निविदा स्वीकारल्यानंतर कार्यालयातून रद्दी ०३ दिवसांचे आत उचलणेची आहे.

ड) खाकी पुठ्ठे व रद्दी उचलण्यापूर्वी वजनाप्रमाणे होणारी रक्कम लगेचच त्याच दिवशी सेल्स टॅक्स व जनरल टॅक्ससह भरणेची आहे.

इ) सिलबंद निविदा या न्यायालयाच्या प्रमुख न्यायाधीशांसमक्ष उघडणेत येतील, गरज भासलेस सदर दिवशी निविदादारांना उपस्थित रहावे लागेल व निविदा उघडणेची तारीख निविदादारांना कळविणेत येईल.

हुकूमावरून,
१६/६/२०२६
अधिक्षक,
अति.जिल्हा.न्यायालय, वडूज,

प्रत:-

१. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, वडूज यांचेकडे न्यायालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी

२. सहा.अधिक्षक, दिवाणी न्यायालय, क.स्तर, वडूज यांचेकडे न्यायालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी

३. संगणक कक्ष, जिल्हा न्यायालय, सातारा - संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता.

४. जादा प्रत- अति.जिल्हा न्यायालय, वडूज यांचेकडे न्यायालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी